सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण -३६२५/प्र.क्र.१०९/ पोल- ३, दि.०७/०१/२०२६

**विषय**:- ई-चलान प्रकल्पासाठी निधी वितरीत करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -३६२५/प्र.क्र.१०९/पोल-३, दि.०७/०१/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०१०७१७१७२८१२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 09-01-2026 17:53:44

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**ई-चलान प्रकल्पासाठी निधी वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण ३६२५/प्र.क्र.१०९/पोल-३**
**गृह विभाग, दुसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ७.१.२०२६.**

वाचा -

१. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५.
२. शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक: सीसीटी-३६१७/प्र.क्र.२/पोल-३, दि.०५.०६.२०१७.
३. शासन निर्णय, गृह विभाग क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६४/विशा-३(अ), दि.०४.०८.२०१७.
४. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १५.११.२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
५. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१७/प्र.क्र.०२/पोल-३, दि.०३.०२.२०१८.
६. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१७/प्र.क्र.०२/पोल-३, दि.१२.११.२०१८.
७. महाराष्ट्र शासनाच्या वतीने अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) आणि मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांचे दरम्यान दि.११.१२.२०१८ रोजी झालेला करार.
८. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) क्र.३२८४/२०१८, दि.११.१२.२०१८ चे कार्यादेश.
९. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) क्र.१०५२/२०१९, दि.२२.०४.२०१९ चे पत्र.
१०. उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१३.०५.२०१९, दि.१४.०८.२०१९, दि.१३.०७.२०२२, दि.६.३.२०२४ व दि.१९.६.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.
११. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१७/प्र.क्र.०२/भाग-२/पोल-३, दि.२३.०९.२०२२.
१२. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) क्र.२४५६/२०१९, दि.२३.०८.२०१९ चे पत्र.
१३. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) क्र.२४५१/२०१९, दि.२३.०८.२०१९ चे पत्र.
१४. राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-२),महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.रासआ/मुख्या-२/टेलिकम्युनिकेशन/२०२२-२३/ब-३४६, दि.०६.०४.२०२३
१५. मे. टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड कंपनीची दि.३१.१०.२०२५ रोजीची देयके.
१६. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांचे क्र.O.W.No.ADGP(Tr.) / ४५ / Planning / E-Challan /५३०९/२०२५, दि.६.११.२०२५ चे पत्र.
१७. मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड कंपनीचे पत्र क्र. TCIL/S&TC/२०२३/२, दि.२६.७.२०२३.
१८. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१७/प्र.क्र.०२/भाग-३/पोल-३, दिनांक ११.५.२०२३ व दिनांक ४.८.२०२३ व दिनांक १.१२.२०२३ व दिनांक २३.१.२०२४. व दिनांक १२.६.२०२४ आणि दिनांक १०.१२.२०२४.
१९. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६२०/प्र.क्र.२७/पोल-३,दिनांक १५.३.२०२४ (मुदतवाढ)
२०. शासन निर्णय़, गृह विभाग क्र.संकीर्ण ३६२४/प्र.क्र.१७०/पोल-३, दि.३०.३.२०२५
२१. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पूरक-२०२५/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.१४.७.२०२५
२२. शासन निर्णय़, गृह विभाग क्र.संकीर्ण ३६१७/प्र.क्र.२/भाग-२/१२४६२५८/पोल-३, दि.२२.९.२०२५
२३. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.८.१०.२०२५

**<u>प्रस्तावना</u>** -

राज्यातील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असुन त्यामुळे वाहतुक कोंडी व इतर समस्या निर्माण होत आहेत. वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडुन दंड वसुलीदरम्यान वाहतुक पोलीस कर्मचारी/अधिकारी यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वाहतुक समस्यांवर अंकुश ठेवणे व कसुरदार व्यक्तींवर प्रभावी तथा पारदर्शकपणे कारवाई करण्यासाठी राज्यामध्ये ई-चलान प्रकल्प राबविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु.५९,१२,३१,५०७/- एवढ्या निधीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता शासन निर्णय, गृह विभाग दि.०३.०२.२०१८ नुसार देण्यात आली आहे. ई-चलान प्रकल्पाच्या निविदा प्रक्रीयेतुन पात्र ठरलेल्या पुरवठादाराच्या निवडीस उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीने दि.०७.०९.२०१८ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या वतीने अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) आणि मे. टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांचे दरम्यान दि.११.१२.२०१८ रोजी पाच वर्षाचा करार करण्यात आलेला आहे. संदर्भ क्र.८ येथील पत्राद्वारे मे. टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांना कार्यादेश देण्यात आले आहेत.

उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१३.०७.२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार संदर्भ क्र.११ येथील शासन निर्णयान्वये राज्यात ई-चलान प्रकल्पाच्या कार्यान्वयन तसेच देखभाल व दुरुस्तीसाठी (Operation & maintenance) येणाऱ्या रु.९० कोटी इतक्या अतिरिक्त निधीच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. तसेच ई-चलान प्रकल्पाच्या एकूण रु.१४९ कोटी इतक्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तदनंतर आता संदर्भाधिन क्र. २० येथील दि.१५.३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये वन स्टेट वन ई-चलान प्रकल्पासाठी पुरवठादार मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांची मुदत दि.७.३.२०२४ रोजी संपुष्टात येत असल्याची वस्तुस्थिती विचारात घेऊन वन स्टेट वन ई-चलान प्रकल्पासाठी पुरवठादार मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंटस् इंडिया लिमिटेड यांना सदर शासन निर्णयातील नमूद करण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहून २ वर्षे किंवा एन.आय.सी. ची ई-चलान प्रणालीची अंमलबजावणी राज्यभर विभागनिहाय होण्याचा कालावधी यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

ई-चलान प्रकल्प कराराच्या तरतुदीप्रमाणे पुरवठादार मे. टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांना प्रत्येक ई-चलान व्यवहाराकरिता याप्रमाणे प्रत्येक तिमाहीकरिता रक्कम देय आहे. डिव्हाईसद्वारे केलेल्या प्रत्येक ई-चलान व्यवहाराकरिता वार्षिक ७५,७२,३७२ ई-चलानच्या मर्यादेपर्यंत प्रत्येक ई-चलान व्यवहाराकरिता रु.१६.५० इतकी रक्कम देय आहे व तदनंतर प्रत्येक ई-चलान व्यवहाराकरिता रु.११.५५ इतकी रक्कम देय आहे. तसेच सीसीटीव्हीद्वारे केलेल्या प्रत्येक ई-चलान व्यवहाराकरिता रु.११.५५ इतकी रक्कम देय आहे.

संदर्भाधिन क्र.१५ येथील मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांनी सादर केलेली देयके ही प्रकल्प सल्लागार मे. केपीएमजी यांनी तपासली असुन ती योग्य असल्याचे कळविले आहे. अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) कार्यालयाने तपासणी केली असून संदर्भ क्र.१६ येथील पत्रान्वये अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) यांनी वरीलप्रमाणे सादर केलेली देयके अदा करणेबाबत शिफारस केली आहे. ही बाब विचारात घेता जीएसटी करासह दि.१ जुलै,२०२५ ते ३० सप्टेंबर,२०२५ **रु.४,६५,५९,८२४/- (अक्षरी रुपये चार कोटी पासष्ट लाख एकोणसाठ हजार आठशे चोवीस फक्त)** इतकी रक्कम मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड या कंपनीस वितरीत करण्याची बाब विचाराधीन होती त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>शासन निर्णय</u>** -

ई-चलान प्रकल्पासाठी दि.०१ जुलै, २०२५ ते दि.३० सप्टेंबर, २०२५ या कालावधीसाठी System Integrator मे. टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांना जीएसटी करासह रुपये

रु.४,२६,५३,७५७.३० तसेच दि.१ एप्रिल, २०२५ ते दि.३० जून, २०२५ पर्यंतचे SBIePay (MDR reimbursement charges) ची रक्कम रु.५,७४,३०८.७१, Mswipe (MDR reimbursement charges) रु.१,३६,३७१.५१ व Billdesk (MDR reimbursement charges) रु.१२,३०,३८७.६५ अशी एकूण रु.१९,४१,०६७.८७ इतकी रक्कम देय ठरत आहे. आणि दि.१ जुलै, २०२५ ते दि.३० सप्टेंबर, २०२५ पर्यंतचे SBIePay (MDR reimbursement charges) ची रक्कम रु.६,६२,८८०.४०, Mswipe (MDR reimbursement charges) रु.१,१८,७६५.२६ व Billdesk (MDR reimbursement charges) रु.११,८३,३५२.६९ अशी एकूण रु.१९,६४,९९८.७५ इतकी रक्कम वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. वरीलप्रमाणे ई-चलान प्रकल्पासाठी रु.४,२६,५३,७५७.३० व MDR reimbursement charges कालावधी - १.४.२०२५ ते ३०.६.२०२५ अखेरचे रु.१९,४१,०६७.८७ व MDR reimbursement charges कालावधी - १.७.२०२५ ते ३०.९.२०२५ अखेरचे रु.१९,६४,९९८.७५ असे एकूण रु.४,६५,५९,८२३.५२ i.e. **रु.४,६५,५९,८२४/- (अक्षरी रुपये चार कोटी पासष्ट लाख एकोणसाठ हजार आठशे चोवीस फक्त)** इतकी रक्कम वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त प्रमाणे होणारा खर्च हा "मागणी क्र.१, २०५५- पोलीस (०१) (०६), ई-चलान प्रकल्प (कार्यक्रम) (२०५५ ए२८४), ५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर निधी आहरित करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणुन घोषीत करण्यात आले आहे. तसेच त्यांनी उपरोक्त निधी आहरित करुन **Telecommunications Consultants India Limited** या कंपनीच्या **९A, Phelps Building, Connaught Place, New Delhi-११०००१** येथील आयसीआयसीआय बँकेच्या शाखेचे खाते क्र. **TCIL५८१०८C००९६०** **(IFSC Code - ICIC००००१०६)** या खात्यावर जमा करावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ मधील वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग-दोन, मधील अ.क्र.२७ (अ) नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार, तसेच शासन परिपत्रक वित्त विभाग दि.७/४/२०२५ व १४/७/२०२५ व दि.८.१०.२०२५ अनुसार व वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.३/२०२६/व्यय-७, दि.२/१/२०२६ अन्वये सन २०२५-२६ या वित्तिय वर्षात निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०१०७१७१७२८१२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.01.07 17:20:10 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
३. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
७. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०. मे. टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड, टीसीआयएल भवन, ग्रेटर कैलास-१, नवी दिल्ली-४८.
११. मे. केपीएमजी ॲडवायझरी सर्व्हिसेस प्रा.ली., मुंबई.
१२. वित्त विभाग, व्यय-७/वित्तीय सुधारणा.
१३. अर्थसं-१/गृह विभाग, मुंबई.
१४. रोख शाखा/गृह विभाग, मुंबई.
१५. निवडनस्ती, पोल-३.

*******